श्री. शिरिष ग. जोशी(अध्यक्ष) || श्री व्याघ्रेश्वर प्रसन्न || श्री जगदिश ग. रानडे(खजिनदार)
९०३५५८६११० **श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार** ९८५०६६६५८९
द्वारा : श्री धनंजय श्री रानडे, कार्यवाह
४ रमा माधव, १०५/२, नारायण पेठ, पुणे - ४११०३०.
फोन : (०२०) ९८२२२९५६१० / ९४२३१३८३६५ / आसूद दूरध्वनी :
**व्रत सेवेचे - भक्तीचे - ज्ञानाचे**
Website : www.vyaghreshvar.com रजि नं.:एफ - २२१४ Email : vkp.pune@gmail.com

दि. 23 जुलै २०२२

||श्री व्याघ्रेश्वर प्रसन्न ||

||महारुद्र २०२२ निमंत्रण ||

**सर्व व्याघ्रेश्वर भक्तांस,**
सप्रेम नमस्कार,

१ मार्च २०२२ च्या ४१व्या महाशिवरात्र उत्सवानंतर वेध लागले होते ते श्रावणी महारुद्राचे अर्थातच आपणा सर्वांना पुन्हा भेटण्याचे. यावर्षीचा महाशिवरात्र उत्सव श्री देव व्याघ्रेश्वराच्या कृपेने आणि आपल्या सर्वांच्या सहकार्याने हर्षोल्हासात चांगल्या व आनंदी वातावरणात संपन्न झाला आता आपण सर्व जण श्रावणी सोमवारी होणाऱ्या महारुद्रोत्सवा निमित्ताने जमणार आहोत ...

ऊन, पाऊस, वारा, पाणी यांची तमा न बाळगता प्रवासाची किती दगदग,किती त्रास आपल्याला सोसून आपण फार कष्ट करून इथे येता. बरं इथे आल्यावर देवाचे दर्शन झाल्यावर आपला सगळा शिणवटा दूर होतो, अशी आपली भावना आहे (कष्ट त्रास दगदग हे शब्द फक्त लिहिण्यासाठी बाकी अंगात तर नुसता उत्साह संचारलेला ) परंतु काही जण आपण इथे कशासाठी येतात,आपल्याला नेमकं काय हवे आहे, हे त्यांना कळते का हा मोठा प्रश्न? आपल्याला देव खरोखर हवासा वाटतोना बास याचा विचारच आपण फारसा करत बसायचा नाही. आपल्यावर काही संकट आले, किंबहुना आपले काही वाईट झाले, की देवाचे करतो पूजा अभिषेक इ.एव्हढे करून भागत नाही तर आपण म्हणतो, देवाने असे कसे केले ? आम्ही इतके देवाचे करतो असे म्हणणे यासारखे दुसरे पाप नाही. देवावर विश्वास न ठेवणारा माणूस एकवेळ परवडला, कारण "देवाने वाईट केले " किमान तो असे तरी म्हणत नाही. देव खरोखर अत्यंत दयाळू मायाळू आहे, त्याला कुणाचेही दुःख सहन होत नाही. कोणत्या आईला आपल्या मुलाला दुःख, कष्ट झालेले आवडेल ? तुमचं काही चुकले तर शिक्षा हि होणारच म्हणून देवाने माझे वाईट केले ही खोटी समजूत प्रथम मनातून काढून टाका. ही तर जीवा शिवाची भेट ... जय व्याघ्रेश्वर !!

यंदाच्या **श्रावणातल्या चौथ्या सोमवारी दिनांक २२ ऑगस्ट २०२२** रोजी तुम्हां सर्वांबरोबर **श्रावणी महारुद्रोत्सव** साजरा करण्याचे निश्चित झाले आहे.

**आदल्या दिवशी रविवारी संध्याकाळी श्री व्याघ्रेश्वर मंदिरात म्हणजे २१ ऑगस्ट २२ ला "चक्क्याची महापूजा" होईल. त्यासाठी कुणाला यजमान पद भूषवायचे असल्यास खालील फोन नंबर वर संपर्क साधा ही विनंती. त्यासाठीची देणगी मुल्य रु. २५००/- इतके निश्चित केले आहे.**

**यंदाच्या श्रावणी महारुद्राचे यजमानपद, आपले तहहयात मानकरी ठाण्याचे सौ व श्री मनिष रानडे यांनी स्वीकारलेले आहेच. त्यांच्याबरोबर आपल्यापैकी कोणाला सहयजमानपद स्वीकारावयाचे असल्यास संपर्क साधावा. सहयजमान पदाचे देणगी मुल्य रु. १५,०००/- इतके निश्चित केले आहे.**

श्री धनंजय रानडे ----
०९८२२२९५६१०// ०९४३१३८३६५
श्री श्रीनिवास रानडे---- ०९८२२९६२४५४//०९४०४२१३१३१
**कृपया नोंद घ्यावी की सोमवार दिनांक २२ ऑगस्ट रोजी पहाटे सहा पासून दहा पर्यंत कुणालाही वैयक्तिक अभिषेक आठवा लघुरुद्र पूजेसाठी मंदिर उपलब्ध राहणार नाही. मात्र न्यासाची महारुद्र अभिषेक पूजा संपन्न झाली की त्यानंतर दुपारी तीन नंतर सूर्यास्तापर्यत वैयक्तिक अभिषेक, लघुरुद्र मंदिरात श्री अरविंद जोशी गुरुजी मार्फत करता येतील.**

सोमवारी,श्रावण कृष्ण एकादशी, २२ ऑगस्ट रोजी, श्री श्रीहरी रानडे गुरुजींच्या नेतृत्वाखाली ब्रम्हवृंदाकडून महारुद्र आवर्तनास ठीक सकाळी ७:०० वाजता सुरुवात होईल.

महारुद्र संपन्न झाल्यानंतर सर्व भक्तांनी )महाप्रसादाचा लाभ घ्यायचा आहे. **महारुद्राचे यंदाचे नाममात्र शुल्क आहे. प्रतिव्यक्ती रु २५०/- आहे**. श्रावणी महारुद्र उत्सवात आपण न्यासाचा आर्थिक भार खालील गोष्टींकरता देणगी देऊन हलका करु शकता,

१) चहा-कॉफी रु. -२०००/-अंदाजे
२) महारुद्रात सहभागी गुरुजींचा नाश्ता रु. -२५००/-अंदाजे
३) महाप्रसादातील गोड पदार्थ रु. -१००००/-अंदाजे
४) महाप्रसादाचा स्वयंपाक "करणावळ" रु. -८०००/-अंदाजे
५) पूजेची तयारी फुले, हार इ रु. -१५००/-अंदाजे
६) पाणी व इतर व्यवस्थापन रु. -१५००/-अंदाजे

आपल्याला सहभाग घ्यायचा असेल तर आपले नाव, पत्ता,फोन नंबर आम्हांला १५ ऑगस्ट २२ पर्यंत कळवावा.

संपर्क ; श्री श्रीनिवास रानडे (सहसचिव) ०९८२२९६२४५४//०९४०४२१३१३१
सौ पुर्वा उदय रानडे (महिला आघाडी अध्यक्ष) ---०९७६६९७७०४०

या शिवाय रविवारी रात्री गप्पागोष्टींबरोबर विशेष मेन्यूचा आस्वाद घ्यायचा आहेच.

यंदाचा महारुद्रोत्सव हा एकादशीच्या दिवशी आलाय आपल्यापैकी कोणी जर एकादशीचा उपवास करत असाल तर आम्हाला त्याची आगाऊ कल्पना द्यावी म्हणजे फराळाची व्यवस्था करता येईल आपली गैरसोय होणार नाही ह्याची काळजी आम्ही घेऊ.

आजपर्यंतची वाटचाल तुम्हा सर्वांच्या सहकार्यानेच झाली आहे. इथून पुढची वाटचाल यशस्वी करण्यासाठी या मंदिर जिर्णोद्वार व परिसर विकासकामांसाठी आपले योगदान हवे आणि ते आपल्याकडून मिळेल अशी खात्री आहे. त्याचे कारण आपल्याच परिवारातील काही नतद्रष्ट लोक ह्या कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न करत आहेत त्यांच्याविरोधात उभे राहून तसेच श्री व्याघेश्वर कुलस्वामी परिवाराची ताकद वाढवा ही नम्र विनंती. .. जय व्याघ्रेश्वर !!!

**रानडे, मनोहर, फफे, दीक्षित, आखवे, कंद्रप (भारद्वाज गोत्र ) वैशंपायन, सहस्त्रबुद्धे (नित्युंदन गोत्र) केतकर (गार्ग्य गोत्र) धारप, विद्वांस, मराठे (कपि गोत्र) जोशी (काश्यप गोत्र) हे सर्व आपल्या कुटुंबातील आहेत. पण अजून आपल्या परिवाराशी जे जोडले गेलेले नाहीत त्यांना घेऊन या, सामील करून घ्या.**

श्री व्याघेश्वर स्मरणिकेसाठी आपल्याला वारंवार आवाहन केले आहेच त्यासाठी आपले लेख, कविता, फोटो इ. साहित्य बरोबर आणा आणि आम्हाला लवकरात लवकर द्या..

**सर्वात शेवटी पण महत्वाचे**

**SHRI VYAGHRESHVAR KULASWAMI PARIVAR**
*Central Bank of India, Deccan Gymkhana branch, Pune
**SB A/C No. 1014330094**
**IFSC : CBIN0280655**

आणि

**SHRI VYAGHRESHVAR KULASWAMI PARIVAR**
State Bank of India, Dapoli Branch, Dist. Ratnagiri.
**SB A/C No.11325447697**
**IFSC : SBIN0001047**

**तुम्ही चेक किंव्हा रोख रक्कम सुद्धा भरू शकता सर्व व्याघ्रेश्वरीयन्सना विनंती की रक्कम भरल्यावर त्याची पावती किंवा स्क्रिनशॉट श्री श्रीनिवास रानडे --- ०९८२२९६२४५४ ह्यांच्या व्हाट्सएप नंबरवर जरूर पाठवा ..**

श्री व्याघेश्वर परिवाराची वेबसाईट नव्याने तीन वर्षापूर्वी सुरू केलेली आहे त्याचा अड्रेस देत आहे http://vyaghreshvar.com त्यावर आपल्या व्यवसायाची जाहिरात आपण देऊ शकता.. त्यासाठी मूल्य प्रति वर्ष आहे. रु. २०००/-
संपर्क श्री धनंजय रानडे --- ०९८२२२९५६१० // ०९४३१३८३६५
धन्यवाद .... ।। जय व्याघ्रेश्वर ।। जय व्याघ्रेश्वर ।।जय व्याघ्रेश्वर ।।

23/7/2022

स्वागतोत्सुक
श्री शिरीष जोशी (अध्यक्ष) / श्री धनंजय रानडे (सचिव)
**श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार**